SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,
MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in, E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in, E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ:शिवाजी/संलग्नता/टी-२/शासन टे./ दि. 22 AUG 2024

No - 1865

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालयाने / संस्था,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

विषय : आर्थिकदृष्ट्या मागास (EBC),आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS),सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC), इतर मागास वर्ग (OBC)प्रवर्गातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनीकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम शैक्षणिक संस्थानी न घेणेबाबत.

संदर्भ :१) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रं.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/ताशि.-४ दिनांक १९ जुलै,२०२४ रोजीचे पत्र.

२) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रं.ईबीसी -२०१८/प्र.क्र.३८/ताशि.-४ दिनांक १४ फेब्रुवारी,२०१८ रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे / विविध पध्दतीने प्रवेश घेण्या-या आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS),सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC), इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील व्यावसायिक व बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देतेवेळी शासन पत्रानुसार कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.पी.एस.पांडव )
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत : शासन परिपत्रके जोडली आहेत.

**आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम शैक्षणिक संस्थांनी न घेणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४**
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: १९ जुलै, २०२४.

**वाचा:** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७.१०.२०१७.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४, दि.१४.०२.२०१८.
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८.०७.२०२४.

**शासन परिपत्रक :** उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रकियेद्वारे / विहित पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येते. आतापर्यंत व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या वरील प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना (मुले व मुली) शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यात येत होती. परंतु, उपरोक्त वाचा क्र.०३ येथील शासन निर्णयान्वये, व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित वरील प्रवर्गातील मुलींना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ५० टक्के ऐवजी १०० टक्के शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांना १०० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम भरण्याचा आग्रह करण्यात येऊ नये. तसेच, ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ५० टक्के शुल्क भरल्यास त्यांना प्रवेश देणे क्रमप्राप्त आहे. अशा पध्दतीने शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी, असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना वाचा क्र.०२ येथील परिपत्रकान्वये यापूर्वी दिलेल्या आहेत. असे असतानाही राज्यातील काही शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क भरण्याचा आग्रह धरत असल्याच्या किंबहुना शुल्क भरल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थी, पालक, विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त होत आहेत.

३. वरील पार्श्वभूमीवर आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश देताना, त्यांच्याकडून शिक्षण शुल्क न आकारण्याबाबत शैक्षणिक संस्थांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तसेच, विहित मार्गाने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या वरील प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थीनींना १०० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून प्रवेशाच्यावेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देण्यात यावा. ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्यांचेकडून फक्त ५० टक्के शिक्षण शुल्क घेऊन, त्यांना प्रवेश देण्यात यावा.

२) शैक्षणिक संस्थांनी योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांना देऊन, संबंधित योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलच्या वेळापत्रकानुसार अर्ज भरण्याबाबत कळवावे.

४. आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्काच्या रकमेचा भरणा करावा.

५. संबंधित संचालनालयाने परीक्षा शुल्काची रक्कम योजनेंतर्गत अर्ज भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या आधार-संलग्नित बँक खात्यात थेट जमा करावी. तसेच, शिक्षण शुल्काची अनुज्ञेय रक्कम संस्थेच्या बँक खात्यात थेट जमा करावी. प्रवेशाच्यावेळी संस्थांनी विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काचा भरणा करुन घेतला असल्यास, सदर रक्कम संस्थेने विद्यार्थ्यांना परत करावी.

६. वरील सूचना संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व संचालक, कला संचालनालय, मुंबई यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व शिक्षण संस्थांच्या तसेच, विद्यापीठांच्या निदर्शनास आणून, त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश द्यावेत. सदर सूचनांचे पालन न करणाऱ्या संस्थांना समज द्यावी व आवश्यकता वाटल्यास सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांविरुध्द कारवाई करावी.

७. संबंधित संचालकांनी सदर परिपत्रकास सर्व प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी द्यावी. तसेच, संचालनालयांच्या संकेतस्थळावर हे परिपत्रक प्रसिध्द करावे.

८. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०७१९१८५७३३५४०८ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(शहाजहान मुलाणी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
८. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
९. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
१०. सहसंचालक, उच्च शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
११. अवर सचिव (मशि-२ व तांशि-६), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती/तांशि-४.

**आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्श्याची शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन,मादाम कामा मार्ग ,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई .४०००३२
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०१८

**परिपत्रक :**

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तंत्र शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या अखत्यारितील विविध मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश पध्दतीने / विहित पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सदर ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्तीची रक्कम पात्र विद्यार्थ्यांना बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

२. राज्यातील बऱ्याचशा शिक्षण संस्था आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रवेशाच्यावेळी १०० टक्के शिक्षण शुल्क भरण्याचा आग्रह धरतात किंबहूना १०० टक्के शिक्षण शुल्क भरल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देत नाहीत, अशा तक्रारी विद्यार्थ्यांकडून , पालकांकडून, विविध संघटनांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे वारंवार प्राप्त होत असतात. वास्तविक प्रवेशाच्यावेळी अशा विद्यार्थ्यांकडून फक्त त्यांच्या हिश्श्याची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी घेणे अपेक्षित आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम शासनाकडून शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे व तद्नंतर विद्यार्थ्यांनी ती शिक्षण संस्थांमध्ये भरणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने याव्दारे सूचित करण्यात येते की, सर्व संबंधीत शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची १०० टक्के रक्कम अथवा पूर्ण रक्कम विद्यार्थ्यांनी भरावी असा आग्रह धरु नये. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांना १०० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम भरण्याचा आग्रह करण्यात येऊ नये. तसेच ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ५० टक्के शिक्षण शुल्क भरल्यास त्यांना प्रवेश

देणे क्रमप्राप्त आहे. अशा पध्दतीने शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा सक्त सूचना याव्दारे देण्यात येत आहेत. ही बाब संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय व संचालक, कला संचालनालय यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व शिक्षण संस्थांच्या कटाक्षाने निदर्शनास आणावी. याउपर अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास संबंधीत संस्थांना समज द्यावी व आवश्यकता वाटल्यास संस्थांविरुध्द कारवाई करावी.

३. सदर परिपत्रकास सर्व प्रसिध्दी माध्यमांव्दारे संबंधीत संचालकांनी प्रसिध्दी द्यावी. तसेच संचालनालयांच्या संकेत स्थळांवर हे परिपत्रक जाहिर करावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१४१३११५५५७०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2efbf911362ce57b361b7f36471cb98eb98ed47e7d68b061211b9d7e6e0fc2e3, cn=Madan Maruti Morve
Date: 2018.02.14 13:17:49 +05'30'

**( म.मा.मोरवे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
३. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
६. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
७. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
८. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये
९. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये

१०. सर्व सहसंचालक, कला संचालनालय विभागीय कार्यालये

११. सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१२. सर्व अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१३. सर्व कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी,

१५. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,

१६. निवड नस्ती (तांशि-४)